तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in

क्रमांक : १०/एनजीपी/विनाअनुदानित पदविका/२०११/ १३६
दिनांक : 21 मार्च MAR 2011

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

**विषय : विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्यात उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी/ पदविका संस्था तथा अकृषि विद्यापीठातील अध्यापकीय पदांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत..**
**संदर्भ : शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग निर्णय क्र. संकीर्ण २०१०/ (५०३/१०) विशि १, दि. २५.२.२०११**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन शासन निर्णय पहावा. त्वरित संदर्भासाठी प्रत सोबत जोडत आहे.

सदर शासन निर्णयातील, अ.क्र. ४ व ८ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नित अशासकीय विनाअनुदानित तंत्रनिकेतनातील प्राचार्य तसेच प्राचार्याव्यतिरिक्त उर्वरित अध्यापकांचे नियतवयोमानामध्ये वाढ करण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णयामध्ये नमूद बाबींची पूर्तता करुन उपसमितीच्या शिफारशीसह सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याच्या दिनांकापूर्वी किमान ३ महिने पूर्व या संचालनालयाकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तरी, आपल्या अधिपत्याखालील विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांतील प्राचार्य/ अध्यापकांचे सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याकरीता, विभागीय कार्यालय स्तरावर छाननी समिती गठित करण्यात यावी. तसेच शासन निर्णयामध्ये नमूद बाबींची पूर्तता करुन समितीच्या शिफारशीसह सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याकरीता एकत्रितरित्या अहवाल या संचालनालयास सादर करावा., ही विनंती.

( श्रीमती ए.सी. अत्तार )
शिक्षण व आस्थापना अधिकारी,
तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

पृष्ठांकन जा.क्रं.विकाऔ/आस्था-२/२०११/ २५८३
दि. 9 APR 2011

प्रति,
**प्राचार्य, अनुदानित/विनाअनुदानित संस्था,**
---------------------------------
-------------------

**यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे व आपल्या संस्थेतील प्राचार्य /अध्यापकांचे सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्या बाबतचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावा.**

**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**

**प्रत:- श्री.एस.आर.कुलकर्णी, प्रोग्रॅमर यांना प्रत देउन सुचित करण्यात येते की, सदर पत्र या कार्यालयाच्या वेब साईटवर अपलोड करण्यात यावे.**

विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्यात उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी व पदविका संस्था तथा अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील अध्यापकीय पदांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१०/(५०३/१०)विशि-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २५ फेब्रुवारी , २०११

वाचा: १) केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे पत्र क्र.१-३२/२००६-यू.II/यू.I(i) दिनांक ३१ डिसेंबर, २००८
२) शासन निर्णय क्र.एनजीसी-२००९/(२४३/०९)/विशि-१, दिनांक १२ ऑगस्ट, २००९ चे आदेश
३) केंद्र शासनाच्या मनुष्य बळ विकास मंत्रालयाचे क्र.एफ.१-७/२०१०-यू.II, दिनांक ११ मे, २०१० चे पत्र.
४) विद्यापीठ अनुदान आयोगाचे विनियम २०१० चे क्र.एफ.३-१/२००९, दिनांक ३० जून, २०१०
५) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची अधिसुचना क्र. ३७-३/लिगल/२०१०, दि. ५ मार्च २०१० (पदवी)
६) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची अधिसुचना क्र. ३७-३/लिगल/२०१०, दि. ५ मार्च २०१० (पदविका)
७) शासन निर्णय क्र. एस.पी.सी.-२०१०/(३४/१०)/ तां.शि.-२, दि. २० ऑगस्ट २०१०

**प्रस्तावना :** राज्यातील अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ, अभिमत विद्यापीठे संलग्नित महाविद्यालये व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित पदविका संस्थातील शिक्षकांच्या विविध सेवाविषयक बाबींसंदर्भात वेळोवेळी विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद व केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून नियम, विनियम विहित करण्यात येतात.

२. विद्यापीठे व इतर शैक्षणिक संस्थांमध्ये शिकविण्यासाठी पात्र व अनुभवी शिक्षकांची कमतरता असल्याकारणाने व परिणामी रिक्त जागांचे प्रमाण वाढल्यामुळे केंद्र शासनाने दि.२३-३-२००७ च्या आदेशान्वये केंद्रीय शैक्षणिक संस्थेमधील शिक्षकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे केले आहे. तसेच रिक्त पदांची परिस्थिती व शिक्षकांची शारिरिक क्षमता विचारात घेऊन ६५ वर्षाच्या पुढे ५ वर्षापर्यंत पुनर्नियुक्ती करण्याचाही निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. याबाबत मनुष्यबळ विकास मंत्रालयाने दि.३१-१२-२००८ च्या पत्रामध्ये स्पष्ट केले आहे.

३. राज्यातील विद्यापीठे व शैक्षणिक संस्था (शासकीय/अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित अशासकीय महाविद्यालये व तंत्रनिकेतने) यामध्ये सुध्दा सद्यःस्थितीत शिक्षकांच्या जागा मोठ्या

प्रमाणावर (सुमारे १७०००) रिक्त आहेत. अनुभवी व पात्र उमेदवारांची कमतरता असल्यामुळे उक्त परिस्थिती निर्माण झालेली आहे.

४. राज्यात उच्च शिक्षण क्षेत्रात कार्यरत अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे असून शासकीय महाविद्यालयातील शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे आहे.

५ तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थातील अध्यापकांना शासनाच्या अनुक्रमे दि. १८. १२ १९९९ व दि. २७.२.२००३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या शिफारसीनुरुप पाचव्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतन श्रेण्या लागू करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतूदी नुसार पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या अशासकीय अनुदानित संस्था वगळता इतरत्र सर्व संस्थात अध्यापकांचे सेवा निवृत्तीचे वय ५८ वर्षे निर्धारीत करण्यात आले आहे. मात्र पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या अशासकीय अनुदानित संस्थातील अध्यापकांचे सेवा निवृत्तीचे वय ६० वर्षे निर्धारीत आहे. दि. २७.२. २००३ रोजीचा शासन निर्णय लागू होण्यापुर्वी अशासकीय अनुदानित पदवी संस्थासह पदविका संस्थातील अध्यापकांचेही सेवा निवृत्तीचे वय ६० वर्षे होते. परंतु सर्व शासकीय संस्थात अध्यापकांचे सेवा निवृत्तीचे वय सुरुवाती पासूनच ५८ वर्षे आहे.

६. उपरोक्त विवरणावरुन हे स्पष्ट होते की, राज्यात कार्यरत विविध शैक्षणिक संस्थांतील शिक्षकीय पदांचे सेवा निवृत्तीचे वय एकसमान नसून काही ठिकाणी ते ६० वर्षे व काही ठिकाणी ५८ वर्षे असे आहे. देशांतर्गत उच्च शिक्षण व तंत्रशिक्षणात कार्यरत पदवी व पदविका संस्थातील शिक्षकीय पदांच्या सेवाशर्ती व वेतनश्रेण्या विद्यापीठ अनुदान आयोग तथा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेद्वारा निर्धारीत केल्या जातात व या सेवाशर्ती तथा वेतनश्रेण्या जशाच्या तशा लागू करणे बंधनकारक असूनही राज्यात तशी कार्यवाही झाली नसल्याने वेतन खर्चापोटी केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानासाठी अपात्र होणे, विविध शैक्षणिक संस्थात शिक्षकीय पदे रिक्त रहाणे व यामुळे शैक्षणिक संस्थाच्या प्रवेश क्षमतेत केंद्र शासनाद्वारा घट करणे तथा शैक्षणिक संस्थेच्या कार्यक्षमतेवर विपरीत परीणाम होणे इत्यादी बाबी उद्भवत आहेत. सद्य:स्थिती विचारात घेऊन उच्च शिक्षण व तंत्र शिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत विविध अकृषी विद्यापीठे, शासन अनुदानित अभिमत विद्यापिठ, तंत्रशास्त्र विद्यापीठ तथा पदवी व पदविका संस्थातील शिक्षकीय पदांच्या सेवानिवृत्तीच्या वयात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

सदर प्रकरणी केंद्र शासनाचे मनुष्यबळ विकास विभाग, विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्याकडून सहाव्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतन संरचना लागू करण्या संदर्भात प्राप्त शिफारसी, तथा विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या कार्यकक्षेतील अभ्यासक्रम राबविणारी अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ, शासन अनुदानित अभिमत विद्यापिठ, अकृषी विद्यापीठांशी संलग्नीत महाविद्यालये व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित तंत्र निकेतनातील अध्यापकांचे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय निर्धारीत केल्याचे निकष व अनुषंगिक बाबींचा साकल्याने विचार करुन मंत्रिमंडळाच्या मान्यतेने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

१) राज्यांतर्गत कार्यरत विवीध अकृषी विद्यापिठांशी संलग्नित शासकीय महाविद्यालय व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र निकेतनातील प्राचार्यांचे नियतवयोमानानुसार कमाल सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६५ वर्षे करण्यात येत आहे. परंतु वयाच्या ६२ वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापुर्वी प्राचार्यांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारसीनुसार संबंधित प्राचार्यांना कमाल ६५ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल. शासकीय प्राचार्य

२) राज्यांतर्गत कार्यरत विवीध अकृषी विद्यापिठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांचे नियतवयोमानानुसार कमाल सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षावरुन ६५ वर्षे करण्यात येत आहे. परंतु वयाच्या ६२ वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापुर्वी प्राचार्यांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारसीनुसार संबंधित प्राचार्यांना कमाल ६५ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

३) राज्यांतर्गत कार्यरत महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित अशासकीय अनुदानित तंत्र निकेतनातील प्राचार्यांचे नियतवयोमानानुसार कमाल सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६५ वर्षे करण्यात येत आहे. परंतु वयाच्या ६२ वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापुर्वी प्राचार्यांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारसीनुसार संबंधित प्राचार्यांना कमाल ६५ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

४) राज्यांतर्गत कार्यरत विवीध अकृषी विद्यापिठांशी संलग्नित अशासकीय विनाअनुदानित महाविद्यालयातील तथा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित अशासकीय विना अनुदानित तंत्र निकेतनातील प्राचार्यांचे नियतवयोमानानुसार कमाल सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करण्यात येत आहे. परंतु वयाच्या ६२ वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापुर्वी प्राचार्यांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारसीनुसार संबंधित प्राचार्यांना कमाल ६५ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही संबंधित संचालनालयाच्या मान्यतेने करण्यात येईल.

५) राज्यांतर्गत कार्यरत विवीध अकृषी विद्यापिठांशी संलग्नित शासकीय महाविद्यालये व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र निकेतनातील प्राचार्याव्यतिरीक्त उर्वरीत अध्यापकांचे नियतवयोमानानुसार कमाल सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६२ वर्षे करण्यात येत आहे. परंतु वयाच्या ६० वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापुर्वी अध्यापकांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारसीनुसार संबंधित अध्यापकांना कमाल ६२ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

६) राज्यांतर्गत कार्यरत विवीध अकृषी विद्यापिठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्याव्यतिरीक्त उर्वरीत अध्यापकांचे नियतवयोमानानुसार कमाल सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षावरुन ६२ वर्षे करण्यात येत आहे. परंतु वयाच्या ६० वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापुर्वी अध्यापकांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारसीनुसार संबंधित अध्यापकांना कमाल ६२ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

७) राज्यांतर्गत कार्यरत महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित अशासकीय अनुदानित तंत्र निकेतनातील प्राचार्याव्यतिरीक्त उर्वरीत अध्यापकांचे नियतवयोमानानुसार कमाल सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६२ वर्षे करण्यात येत आहे. परंतु वयाच्या ६० वर्षानंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापुर्वी अध्यापकांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारसीनुसार संबंधित अध्यापकांना कमाल ६२ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

८) राज्यांतर्गत कार्यरत विवीध अकृषी विद्यापिठांशी संलग्नित अशासकीय विनाअनुदानित महाविद्यालयातील तथा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित अशासकीय विना अनुदानित तंत्र निकेतनातील प्राचार्याव्यतिरीक्त उर्वरीत अध्यापकांचे नियतवयोमानानुसार

कमाल सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षे करण्यात येत आहे. परंतु वयाच्या ६० वर्षांनंतर सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापुर्वी अध्यापकांच्या कामकाजाचा विहीत समितीकडून आढावा (Performance Review) घेण्यात येईल. सदर समितीच्या अहवालातील शिफारसीनुसार संबंधित अध्यापकांना कमाल ६२ वर्षापर्यंत सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्याची कार्यवाही संबंधित संचालनालयाच्या मान्यतेने करण्यात येईल.

९) अध्यापक व प्राचार्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, केंद्र शासनाचे मनुष्यबळ विकास मंत्रालय आणि राज्यशासनाने वेळोवेळी विहीत केलेली पात्रता, अर्हता इत्यादी बाबी लागू राहतील.

१०) सदर निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा नियमांमध्ये आवश्यक त्या सुधारणा स्वतंत्ररित्या करण्यात येत आहे.

२. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे अध्यापक यांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६० वरुन ६२ पर्यंत व प्राचार्य यांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६२ वरुन ६५ वर्षे करण्यासाठी आढावा घेण्यासाठी निम्न निर्देशित केल्याप्रमाणे आढावा समिती (Performance Review Committee ) गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सचिव / प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण | अध्यक्ष |
| २) | संचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण | उपाध्यक्ष |
| ३) | संबंधीत अकृषि विद्यापीठाचे कुलसचिव (पदवी संस्थांसाठी) | सदस्य |
| ४) | संचालक, म.रा. तंत्र शिक्षण परिक्षा मंडळ (पदविका संस्थांसाठी) | सदस्य |
| ५) | विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण | सदस्य |
| ६) | सहसचिव / उपसचिव, विद्यापीठ शिक्षण/ तंत्र शिक्षण | सदस्य सचिव |

३. वरील सर्व संस्थांतील अध्यापक तथा प्राचार्यांच्या सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देतांना संबंधितांनी निम्न बाबींची पुर्तता करणे अनिवार्य राहील. -

१) सदर संस्थांमधील अध्यापक / प्राचार्य यांच्या प्रथम नियुक्त्या विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासनाने विहीत केलेल्या पात्रता, अटी व शर्ती प्रमाणे झालेल्या असणे आवश्यक आहे.

२) संबंधीत अध्यापक / प्राचार्य यांची शारिरीक व मानसिक क्षमता सुदृढ असणे आवश्यक असून त्याबाबत तज्ञ वैद्यकीय समितीचे (Govt. Medical Committee) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३) संबंधीत अध्यापक / प्राचार्यांनी Ph.D अथवा विद्यापीठ अनुदान आयोग तथा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या निकषानुसार Ph. D शी समकक्ष ही शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

४) संबंधीत अध्यापक / प्राचार्य यांचे मुदतवाढीच्या दिनांका पुर्वीचे मागील पाच वर्षातील वार्षिक गोपनीय अहवालाच्या प्रतवारीपैकी कोणतेही तीन वर्षे उत्कृष्ठ (A) आणि दोन वर्षे निश्चित चांगला (B+) असणे आवश्यक आहे.

५) शासकीय संस्था व्यतिरीक्त उर्वरीत संस्थातील अध्यापकीय पदांवर कार्यरत अध्यापकांना सेवानिवृत्तीसाठी मुदतवाढ देण्यापुर्वी संस्था/ विद्यापिठ स्तरावरुन रिक्त पदे भरण्यासाठी किमान दोन वेळा जाहिरातीद्वारे प्रयत्न केलेले असावेत.

४. या संदर्भात वरील सर्व नमूद संस्थांमधील अध्यापक / प्राचार्य यांच्या सेवा पुढे चालू ठेवण्याच्या दृष्टीने परिच्छेद-३ मधिल निकष विचारात घेऊन निम्न नमूद उपसमितीच्या शिफारसीसह संबंधित विभागीय सहसंचालकांनी संचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण यांच्या मार्फत योग्य प्रस्ताव सेवा निवृत्तीसाठी मुदत वाढ देण्याच्या दिनांकापुर्वी किमान ३ महिने पूर्व शासनास/ संबंधित संचालनालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबंधीत अकृषी विद्यापीठे व संस्थांची राहील.

**अ. पदवी संस्थांसाठी छाननी समिती-**

| | |
|---|---|
| १) विभागीय सहसंचालक, उच्च/ तंत्र शिक्षण | अध्यक्ष |
| २) अकृषी विद्यापीठाचे कुलसचिव (पदवी संस्थांसाठी) | उपाध्यक्ष |
| ३) प्रशासकीय अधिकारी , विभागीय कार्यालय | सदस्य सचिव |
| ४) संबंधीत संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |

ब. [redacted]

१) [redacted]

२) [redacted]

३) [redacted]

४) [redacted]

५. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अमलात येईल. तथापि, जे अध्यापक सदर शासन निर्णय निर्गमित होण्यापुर्वीच्या निकषा नुसार दि. २८ फेब्रुवारी २०११ रोजी सेवानिवृत्त होणार असतील त्याचेबाबत परिच्छेद-४ मध्ये नमूद छाननी समितीचे अहवाल शासनास/ संबंधित संचालनालयास पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी संबंधितांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापुर्वी सादर करण्याची जबाबदारी संबंधित विभागीय सहसंचालक, अकृषी विद्यापीठे व संस्थांची असेल.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र. १२/११/सेवा-४, दिनांक १४.१.२०११ अन्वये त्या विभागाने दिलेल्या सहमतीने निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेत क्रमांक २०११०२२५१६०२०२००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

(रा. गो. जाधव)
**शासनाचे उपसचिव**

प्रति,

१. मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, मलबार हील, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु
५. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलसचिव
६. संचालक, उच्च शिक्षण , महाराष्ट्र राज्य, पुणे
७. संचालक, तंत्र शिक्षण , महाराष्ट्र राज्य, मुबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१ महाराष्ट्र , मुंबई (५ प्रती)
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) -१, महाराष्ट्र मुंबई (५ प्रती )
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२ महाराष्ट्र , नागपूर (५ प्रती)
११. महालेखापाल (लेखापरीक्षा) -२, महाराष्ट्र नागपूर (५ प्रती )
१२. संचालक, व लेखा व कोषागारे , (५ प्रती)
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१५. संचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण अधिकारी
१६. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण /तंत्रशिक्षण
१७. मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
१८. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रीशक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
१९. सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी , उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई
२०. वित्त विभाग, (सेवा-४ / सेवा-९ /कोषा-५ /व्यय-५) मंत्रालय, मुंबई
२१. नियोजन विभाग (कार्यासन १४७१)
२२. निवड नस्ती (विशि-१)
२३. निवड नस्ती, (तां.शि-२)